नि.फौ.ख.क्रं.७२/२०२५
सरकार वि. तनू वगैरे
नि.क्र. २८

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०४ यांची जबानी.</u>**

मी ईश्वराला स्मरून शपथ घेते की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | रोहिणी विकल्प टेंभरे, |
| वय सुमारे | : | २९ वर्ष, व्यवसाय– मजुरी |
| निवासस्थान | : | खैरीदिवाण, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**<u>सरतपास</u> – <u>सहा</u>. <u>सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत</u>–**

**१.** घटना दिनांक १०/०१/२०२५ रोजी घडली होती. घटना सकाळी ०८:३० वाजता माझया घरी घडली होती. आमच्या घराचे बांधकाम सुरू होते आणि त्यासाठी खड्डे खोदायचे काम सुरू होते. त्यावेळी रंजन गायकवाड, तनू गायकवाड, तक्षय गायकवाड, मंदा गायकवाड आणि माया गायकवाड हे माझ्या पतीला, माझ्या सासुला आणि मला आडवे झाले. रंजन, तनू, तक्षय, मंदा आणि माया यांनी मला, माझ्या पतीला आणि माझ्या सासुला शिवीगाळ केली. त्यानंतर तक्षय गायकवाड याने माझ्या पतीच्या डोक्यावर सु–याने वार केला. रुपेश गायकवाड याने सुध्दा माझ्या पतीच्या डोक्यावर बुक्क्यांनी मारहाण केली. ज्या सु–याने माझ्या पतीच्या डोक्यावर मारण्यात आले तो मला दाखवल्यास मी तो ओळखू शकते. आता मला जप्त मुद्देमाल क्रमांक ०३/२०२५ वरील कैचीचा लोखंडी पाता दाखवण्यात आला. हा तो सूरा नाही. आज रोजी रंजन गायकवाड, तनू गायकवाड आणि रूपेश गायकवाड न्यायालयात हजर आहेत.

**सरतपास पुर्ण.**

**<u>उलट तपास आरोपींतर्फे वकील आर.जी.काटेखाये साहेब यांच्यामार्फत सुरू</u>.**

**२.** आमच्या घराचे खड्डे खोदण्याच्या कामासाठी मजूर होते. घटनेच्यावेळी दोन मजूर हजर होते. त्यांची नावे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, खोदकाम सुरू असताना आरोपी रंजन याने माझया पतीला असे म्हणुन हटकले होते की, इथे आमचा रस्ता आहे, इथे खड्डे खोदू नका. घटनेच्यावेळी माझ्या घरातील सर्व सदस्य मौक्यावर हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरातील सदस्यांच्या हातात

लाठयाकाठया होत्या. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी तनू गायकवाड हिने माझ्या पतीला असे म्हणुन हटकले होते की, तुम्ही शिवीगाळ करू नका. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या घरातील सदस्यांनी तनू गायकवाड हिचे केसं पकडून तिला ओढले होते. हे म्हणणे खरे आहे की, तक्षय गायकवाड धावत आला होता. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि माझ्या घरातील सदस्यांमध्ये लांबाझोंबी झाली होती. हे म्हणणे खरे आहे की, लांबाझोंबीमध्ये माझे पती खाली पडले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि आमच्यातील भांडण सोडवण्यासाठी आमच्या गावातील सरपंच राहुल काटेखाये आले होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आणि आमच्यात रस्त्याच्या कारणावरून भांडण झाले.

३. पोलीसांनी माझे बयान घेतले होते. पोलीसांना बयान देतेवेळी मी सांगितले होते की, माझ्या पतीच्या डोक्यावर सु–याने वार केला, घटनेच्यावेळी मंदा गायकवाड आणि माया गायकवाड हजर होत्या. आता मला माझे बयान वाचुन दाखवण्यात आले. उपरोक्त बाबी माझया बयानात नमूद नाही. त्या पोलीसांनी का नमूद केल्या नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

४. हे म्हणणे खरे नाही की, तक्षय गायकवाड याने माझया पतीच्या डोक्यावर सु–याने वार केल्याचे आणि आरोपींनी मला आणि माझया परिवाराला शिवीगाळ केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी आज आरोपींविरुध्द खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही**.

| समक्ष | श्रवणोत्तर स्विकृत |
|---|---|
| स्वा/– | स्वा/– |
| **(व्ही. आर. फरकुंडे)** | **(व्ही. आर. फरकुंडे)** |
| न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२), | न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२) |
| पवनी. | पवनी. |
| ०४/११/२०२५ | ०४/११/२०२५ |

नि.फौ.ख.क्रं.७२/२०२५
सरकार वि. तनू वगैरे
नि.क्र. २९

<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०५ यांची जबानी.</u>

मी ईश्वराला स्मरून शपथ घेतो की, मी जे काही सांगेन ते खरे सांगेन, संपुर्ण खरे सांगेन आणि खऱ्याशिवाय काहीही सांगणार नाही –

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | : | बंडू वामन झोडापे, |
| वय सुमारे | : | ५० वर्ष, व्यवसाय– ठेकेदारी |
| निवासस्थान | : | भेंडाळा, |
| तालुका | : | पवनी, जिल्हा: भंडारा. |

**<u>सरतपास</u> – <u>सहा</u>. <u>सरकारी वकील पी. आर. लिंगायत मॅडम यांच्यामार्फत</u>–**

१. घटना दिनांक १०/०१/२०२५ रोजी घडली होती. मी घटनेच्या दुस–या दिवशी खैरीदिवान येथे फिर्यादीच्या घरी गेलो होतो. घटनेबाबत मला काहीही माहिती नाही.

**सरतपास पुर्ण.**

**<u>साक्षदार सरकार पक्षाला सहाय्य करत नसल्यामुळे सरकारी वकीलांच्या तोंडी विनंतीवरून साक्षदाराची उलट तपासणीची परवाणगी देण्यात आली.</u>**

२. पोलीसांनी माझे बयान घेतले नव्हते. आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकीत **भाग अ** वाचून दाखविला. तो बरोबर नाही. पोलीसांनी माझ्या बयानात असे का नमूद केले याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलट तपास आरोपींतर्फे वकील आर.जी.काटेखाये साहेब यांच्यामार्फत –</u>**

३. मी फिर्यादीच्या घराच्या बांधकामाचा ठेका घेतला होता. मी स्वत: काम करत नाही, माझे मजुर काम करतात. माझे मजुर सकाळी ०७:०० वाजता कामाला सुरूवात करतात आणि दुपारी ०३:०० वाजेपर्यंत त्यांची कामे संपतात.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास – काही नाही.**

समक्ष

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे. (न्या.क्र.२),
पवनी.
०४/११/२०२५

श्रवणोत्तर स्विकृत

स्वा/–
**(व्ही. आर. फरकुंडे)**
न्यायदंडाधिकारी, प्र. श्रे., (न्या.क्र.२)
पवनी.
०४/११/२०२५